**महाराष्ट्रातील अग्निशमन सेवांना "अग्निशमन व आणीबाणी सेवा " म्हणुन यापुढे संबोधनेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**शुध्दीपत्र क्रमांक संकीर्ण २००३/९३९/प्र.क्र.१२९/नवि-२४**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक : ऑगस्ट, २००६**

**वाचाः-**१) उप अग्निशमन सल्लागार, केंद्रीय गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. सहा/१४०२८/२/ २००२/ १३/ डीजीसीडी(एफ), दिनांक २२.१०.२००३

२) या विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २००३/९३९/प्र.क्र.१२९/नवि-६,दि. २३ मार्च २००४

**शुध्दीपत्र :-** केंद्रीय गृह मंत्रालयाच्या नागरी संरक्षण महासंचालनालयाने त्यांच्या वरील पत्रान्वये अग्निशमन सेवांना Fire and Emergency Services म्हणून संबोधण्याबाबत आदेश निर्गमित केले आहेत. म्हणून केंद्रीय गृह मंत्रालयाच्यावरील पत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्रातील शासकीय सेवा, महानगरपालिका/नगरपालिका/ सर्व स्थानिक स्वराज्य संस्था/ शासनाचे सार्वजनिक उपक्रम यांचेकडील अग्निशमन सेवानांना यापुढे **"अग्निशमन व आणीबाणी सेवा (Fire and Emergency Services)** "म्हणून संबोधवयाचे आहे. त्यामुळे संदर्भाधीन शासन परिपत्रकामधील" आता यापुढे **"अग्निशमन आणि आणीबाणी सेवा सल्लागार यांचे कार्यालय असे संबोधण्यात येत आहे "** हे वाक्य वगळण्यात आले आहे.

संदर्भाधिन शासन परिपत्रकामधील परि.२ नुसार सर्वसंबंधितांनी याबाबत कार्यवाही करुन त्याचा अनुपालन अहवाल अग्निशमन सल्लागार, मुंबई यांचेकडे पाठवावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( म. दि. आंद्रिवरेकर)
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव

**प्रत,**

मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव
मा.मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव ,
मा.उपमुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव
सर्व मंत्री /राज्यमंत्री
मुख्य सचिव
मंत्रालयीन सर्व विभाग
मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग व कार्यालय प्रमुख
संचालक, नागरी संरक्षण, जुने सचिवालय, मुंबई - ३२
राजयातील सर्व महानगरपालिका आयुक्त / नगरपालिका मुख्याधिकारी
अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय, सांताक्रूझ,मुंबई - ९८
आयुक्त तथा नियंत्रक, नगरपालिका प्रशासन संचालनलय,वरळी,मुंबई - १८
मुख्य अग्निशमन अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,मुंबई-९३
नगर विकास विभागातील सर्व सहसचिव /उप सचिव/ अवर सचिव/कार्यासन अधिकारी
निवड नस्ती नवि-२४.